



# सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ

नोंदणी क्र. ए-३९५ (मुंबई)

कै. गंगाधर पिलाजी चौधरी व कै. रघुवीर पाटील यांच्या स्मृतीस समर्पित

# त्रैमासिक वृत्तपत्रिका



**अंक : १४३** **जानेवारी-मार्च २०१८** **वर्ष : ४१**


✻ *संपादक*
***विनय रघुनाथ राऊत***
९८२३२५११९४७
८२०८६३००३०
सहसंपादक
वंदेश दे. पुरव
तरंग ज. पाटील
सुचिता प्र. पाटील
बिपीन य. पाटील
स्वज्वल व. राऊत
जयप्रकाश वा. राऊत

✻ *सल्लागार*
आमदार हितेंद्र वि. ठाकूर
आमदार कपिल ह. पाटील
आमदार क्षितिज हि. ठाकूर

✻ *विश्वस्त समिती*
***हेमंत ना. राऊत*** अध्यक्ष
९८६०१०२२७०
विरेंद्र न. पाटील
विमल र. राऊत
सुधीर आ. राऊत
मंगेश ग. पाटील
दिपक ना. पाटील
राजीव य. पाटील

✻ *संघाच्या अध्यक्षा*
***प्रणिता पंकज ठाकूर***
९८६०८२१६६६

✻ *खजिनदार*
दिलीप ह. पाटील
९९६९१३४३३६०

✻ *मुख्य चिटणीस*
किशोर रा. ठाकूर
८५५१८४२४५८

✻ *सहचिटणीस*
अभय ज. राऊत
जयेश रा. राऊत

✻ *गृहपाल*
अशोक मो. पाटील
९२७३११३७७०

✻ *सहा. गृहपाल*
रमाकांत ना. पाटील
रूपा विनय राऊत

✻ *ग्रंथपाल*
रंजना दिलीप पाटील
९८६९८४०६१०


संपादकीय

## *संघ कार्यात तरुणाईचा सहभाग*

२१ व्या शतकातील इंटरनेट युगात आजही एका ज्ञातीतील समूहाची आपली समाजव्यवस्था टिकून आहे. आपण रहात असलेल्या प्रामुख्याने पालघर जिल्ह्यात चौकळशी, पाचकळशी, आगरी, दसागरी, मिठागरी, कुणबी, वैती,चोखार, मांगेले,कुपारी, आदिवासी, हरिजन अशा जाती-पोटजाती असलेल्या समाजाचे लोक राहतात. आपल्या ज्ञातीतील लोक फार वर्षांपासून रहात जरी असले तरी तो संघटित सन १९१० साली झाला आहे. आपल्या ज्ञातीची सो पा क्ष स संघ ट्रस्ट फंड ही संस्था गेली १०८ वर्षे निरनिराळे उपक्रम समाजातील लोकांसाठी करीत आहे. संस्था सुरू करून ती आजतागायत कार्यरत ठेवण्यामध्ये अनेकांचे योगदान आहे. सर्वच नावे जागे अभावी देऊ शकत नाही पण डॉ. मधुकर राऊत, कर्मवीर ज. पा. राऊत, वामन जि. पाटील, लक्ष्मण मा.राऊत, चिंतामण रा. राऊत, अरविंद राऊत, इ.चे महत्वाचे योगदान आहे. यानंतर हरिश्चंद्र मा पाटील, रामचंद्र बा पाटील, लीलाधर चौधरी,

---

**-: विशेष सर्वसाधारण सभा :-**

सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ ट्रस्ट फंड ची सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील पहिली विशेष सर्वसाधारण सभा रविवार दि. २९ एप्रिल २०१८ रोजी ठिक दुपारी २.०० वाजता संघाच्या डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाजमंदिर पालघर (प.) येथील संस्थेच्या मान. अध्यक्षा सौ. प्रणिता पंकज ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

**सभेपुढील विषय :-** १. सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ ट्रस्ट फंड च्या घटनादुरुस्ती संदर्भात माननीय धर्मादाय आयुक्तांनी दिलेल्या निकालाच्या अधीन राहुन, दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६०, प्रमाणे घटनादुरुस्तीच्या आवश्यक कार्यवाहीनुसार संघाची घटनादुरुस्ती करुन दि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० प्रमाणे सदर घटनादुरुस्तीची धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी करणे.

दि. ८-४-२०१८ **किशोर रामचंद्र ठाकूर**, मुख्य चिटणीस

टिप :-गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास वर नमुद विषयावर व ठिकाणी नियोजित वेळेच्या अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्यास गणसंख्येचे बंधन नसेल.

पुष्पकांत म्हात्रे, ॲड. हरिश्चंद्र दे. पाटील, वसंत चौधरी इ. नीही आपले योगदान दिले आहे. आपल्या ज्ञातीला ओबीसी ची मान्यता मिळवण्यात पुष्पकांत म्हात्रे, ॲड. ह. दे. पाटील यांचा मोठा वाटा आहे. आमदार श्री. हितेंद्र ठाकूर, आमदार श्री. कपिल पाटील व आमदार श्री. क्षितिज ठाकूर हे तीन दिग्गज आपल्या ज्ञातीचे सल्लागार आहेत. समाजातील दानशूर उद्योजक श्री. राजाराम पाटील हे आजही संघाला भरघोस आर्थिक, मानसिक पाठबळ देत आहेत.आजही संघाच्या स्थापनेपासून संघकार्यात कार्यरत असलेले सर्व विश्वस्त, पदाधिकारी, शाखाध्यक्ष, शाखा चिटणीस, निरनिराळ्या समितीचे सदस्य यांचे योगदान आहेच.

संघाच्या शताब्दी वर्षांपासून शशांक पाटील, पराग राऊत व आताच्या विद्यमान अध्यक्षा सौ प्रणिता ठाकूर असे तरुण अध्यक्षांनी समाजाचे प्रतिनिधित्व केले आहे व करीत आहेत. या तरुण अध्यक्षांनी आपापल्या कल्पनेप्रमाणे नवनवीन समाजपयोगी उपक्रम राबविले. विद्यमान अध्यक्षांनी तर समाजात तरुणांचा सहभाग वाढावा यासाठी महिला , विद्यार्थी व तरुणांसाठी निरनिराळे उपक्रम शाखाशाखातून राबविले आहेत व ते यापुढे सुरू रहावेत यासाठी स्वतः जातीने लक्ष घालणार आहेत. विद्यमान अध्यक्षांच्या प्रयत्नाने संघातर्फे शाखाशाखातून घेतल्या जाणाऱ्या निबंध, चित्रकला, वैयक्तिक स्पर्धा, वार्षिक क्रीडामहोत्सवामुळे बराचसा युवक व तरुण वर्ग आकर्षिला जात आहे. या युवकांना , तरुणांना आवाहन आहे की, त्यांनी फक्त या स्पर्धेपुरते मर्यादित न राहता संघाच्या प्रत्यक्ष कार्यात सहभाग घ्या, संघकार्य व संघाची घटना समजुन घ्या, शाखांचे प्रतिनिधित्व करण्यास पुढे या. संघाच्या निरनिराळ्या समिती कार्यरत आहेत, त्यात सदस्यत्व घेऊन त्या त्या समितीचे उपक्रम यशस्वी करा. आज आपली युवा पिढी निरनिराळ्या सामाजिक, राजकीय, क्रीडा क्षेत्रात चमकत आहेत. आय टी, इंजिनिअरिंग, वैद्यकीय ई. क्षेत्रात पदवीधर , पदव्युत्तर होत आहेत. यांच्या ज्ञानाचा , अनुभवाचा फायदा समाजाला होण्यासाठी या तरुणांनी संघ कार्यात थोडा तरी वेळ देणे आवश्यक आहे.समाज आपल्याकडे येईल हा विचार करण्यापेक्षा आपण स्वतःहून आपल्या समाजाच्या संघातर्फे होत असलेल्या कार्यक्रमात व उपक्रमात स्वतःहून सामिल होऊन समाजाला म्हणजेच समाजातील लोकांना प्रगती पथावर नेण्यास सहकार्य करु या असा मानस आपण सर्वांनी करु या.

**– विनय रघुनाथ राऊत**

---

## महिला विकास समिती स्नेहभोजन

सो पा क्ष स संघ ट्रस्ट फंड च्या महिला विकास समिती तर्फे रविवार दि ३१/१२/२०१७ रोजी टेंभोडे, पालघर येथे समाजातील महिलांचे स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. यात जवळजवळ १०० महिलांनी सहभाग घेतला. संघाध्यक्षा सौ प्रणिता पंकज ठाकूर, विश्वस्त सौ. विमल रघुनाथ राऊत, महिला विकास समिती कार्याध्यक्षा सौ.रुचिता रमेश पाटील सह ज्येष्ठ व मान्यवर महिला उपस्थित होत्या. याप्रसंगी महिलांचे निरनिराळे खेळ, संगीत खुर्ची इ स्पर्धा घेण्यात आल्या. महिलांनी एकमेकांची ओळख करून घेतली. सर्वानी सामिष भोजनाचा स्वाद घेतला. महिला विकास समितीच्या निमंत्रक राखी पाटील यांनी सर्व उपस्थित महिलांचे आभार मानले.

# श्री हेमंत नारायण राऊत, केळवे...



मृदू आणि मितभाषी असे श्री हेमंत नारायण राऊत, ह्यांची आपल्या समाजाच्या विश्वस्त अध्यक्षपदी निवड झाली आहे. विश्वस्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर, समाजाच्या महत्त्वाच्या धोरणांबाबत निर्णय घेण्यात त्यांचा मोलाचा सहभाग समाजास लाभला आहे. वयाच्या सहासष्टाव्या वर्षीही तरुणाला लाजवेल अशा उत्साहात शेतीवाडी आणि समाजकार्यातील त्यांचा वावर अचंबित करून जातो. सन १९६९ साली एस एस सी झाल्यानंतर नाईलाजानेच त्यांना शेती आणि बागायतीत लक्ष घालावे लागले. नाईलाज म्हणून जरी त्यांनी या क्षेत्रात पदार्पण केले असले, तरी नंतर शेती हेच कर्म आणि समाज हाच धर्म मानून त्यांनी स्वतःस या दोन्ही क्षेत्रात वाहून घेतले. पारंपारिक केळी, पानवेल, आले, हळद, भाजीपाला, नारळ, सुपारी अश्या विविध उत्पादनांना आधुनिक उपकरणांची जोड देऊन त्यांनी पिकं घ्यायला सुरुवात केली. लागवडीच्या आधारासाठी लोखंडी अँगलचा मंडप, पानवेलीसाठी ड्रीप इरिगेशन अशा सुविधांचा वापर केला. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी रासायनिक खताचा अल्प वापर करून सेंद्रिय खते आणि शेणखतावर जास्त भर दिला. शेतीमधील या अशा प्रयोगांमुळे त्यांनी भरघोस आणि उच्च प्रतीचे उत्पादन घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या या मेहनतीला आणि विविध उपक्रमाला दाद देत, शेतीतील विशेषतः पान वेलीतील उत्पादनाची दखल घेत, महाराष्ट्र शासनाने सन २००८ सालचा, 'वसंतराव नाईक' शेतीनिष्ठ पुरस्कार देऊन, त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

आपल्याकडे असलेल्या ज्ञानाचा इतर शेतकरी बंधू आणि समाजाला फायदा व्हावा या हेतूने त्यांची नाळ समाज कार्याशी जोडली गेली. आपल्या समाजात शाखा चिटणीस ते विश्वस्त अध्यक्ष अशी झेप ही त्यांच्या कार्याची पोचपावतीच आहे. त्यांचे सामाजिक कार्य हे फक्त आपल्या समाजापुरताच मर्यादित न राहता त्यांनी वेगवेगळ्या संस्थांवर, वेगवेगळ्या पदांवर काम करून समाजऋण फेडण्याचे कर्तव्य चोख बजावले आहे. यात केळवे ताडी उत्पादक सहकारी संस्थेचे चेअरमन, केळवे शेतकरी सोसायटी चे चेअरमन, नूतन विद्या विकास मंडळ या शिक्षण संस्थेचे कार्यवाह आणि खजिनदार, अशा विविध ठिकाणी यांनी काम केले आहे. सन १९९४ साली केळवे येथे झालेल्या कोकण मराठी साहित्य संमेलनात सक्रिय सहभाग घेऊन निवासव्यवस्था प्रमुख म्हणून कार्य बजाविले. याचबरोबर क्षात्रैक्य परिषद सुवर्णमहोत्सव–१९९०, केळवे येथे कार्याध्यक्ष आणि बी एस ई एस वीज प्रकल्प हटाव समिती १९९६ मध्ये खजिनदार म्हणून जबाबदारी पार पाडली आहे.

अशा चतुरस्त्र व्यक्तीची समाजाच्या विश्वस्त अध्यक्षपदी झालेली निवड म्हणजे समाजासाठी भूषणच होय. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा, समाजाला नक्कीच फायदा होईल याची खात्री आहे. श्री हेमंत नारायण राऊत यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा, तसेच त्यांना दीर्घायुरोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**नमस्कार न् रामराम वाडवळांदो,**

१७ डिसेंबर २०१७, मनान न तनान वाडवळ अहणारा परतेकजण यो दिह कवास विहरणार नय. समाजायी स्थापना जाल्यापासून, मणजेस १९१० नंतर निसता वाडवळीमन जालेला यो पयलास कारेक्रम. कारेक्रमाला जवळ जवळ शार पिढ्याया लोकयीन आपली हजेरी लावली. ८० वहरापासून ८ वहरापरेंतशा भाहा बयणीयी भाग घेऊन वाडवळीया यो उतसोव येशस्वी केला.

या उतसोवायी पायाभरणी जाली दोन वहरापूर्वी. बहुतेका हातात हिंडयाफोन आला, व्हाट्सएप आलं, या उपेग करून आपली नरपडशी बयण प्रविणा राऊतजून आपला वाडवळ कट्टा सालू केला, कट्ट्याहा नियम एकस, जे काय लिहव्या ते वाडवळीतस. पटेल त्यान रेव्या नय ते रस्ता कापव्या. एकास विसारान जपाटलेल्या सबासदांमुळे कट्ट्यान लगेस बाळसं धरलं, न रोजस्या वाडवळी खुराकापायी त्याही वाढव झपाटयान होत गेली. आता पोर बोठं जालं का घरशाना त्याहं कवतिक अहतेस. तहस आपल्या कट्ट्याहा जालं. कोणी कविता, कोणी बऱ्या बऱ्या पोस्ट टाकत रेले. जकले आवडीन लिहव्या लागले. लोकं वासत गेली, लिहत गेली न एकदुहऱ्याना हांगतव गेली. मंगं ज्याना वाडवळी हमजतोव नय अही माहणव कट्ट्यात सामिल जाली, वाडवळी हिकव्या परेत्न करव्या लागली. पुडे कट्याहा मेळावा ठेव्या विसार आला, पण त्याहाटी पैसा लागेन भगुन एक कट्टानिधि सुरु करव्या विसार हरेश राऊत यान मांडला, त्यानस यी जबाबदारी आंगार घेटली न एक लाखाहां निधी जमव्याह उद्दिष्ट ठेवलं. वेळ गेला पण ते पुरं जालं. फक्त वाडवळीला समर्पित अहलेल्या या कट्ट्यारश्या २५० श्या मागे पुडे सबासद अहणाऱ्या समाजाहा भाहा बायणीह घणस कवतुक. यायी अवघ्या एका वहरात वाडवळी संवर्दनाहाटी एक लाखा वरसन रुपये गोळा करून ते समाजामेरे जमा केल्यात. आपले २५० लोकं जर वाडवळीहाटी अही किमया करत अहतीन ते गावोगाव न शेरामन रेणाऱ्या जवळपास दहा हजारा आही पाही अहणाऱ्या समाजाशा भाहा बयणींन ठरवलं ते यो वाडवळ कट्टा फंड १० लाखावरसन आकडा पार करेन यायी खात्री हाय. आमश्या याआवाहनाला तुमी नक्कीस परतीसाद देतीन यो विश्वास आमाला हाय.

हिंडयाफोनवर एकत्र झालेल्या भाहाबयणींना परतेक्ष भेटव्या उद्देशान वाडवळ मेळावा आपल्या सो.पा.क्ष.स.संघ.ट्रस्ट फंड स्या मान्यतेन घेव्या ठरलं. त्यायी जबाबदारी घेतली कट्याहे खेडे प्रवीणा पुरव, हरेश राऊत, चारुशील पाटील , सिद्धांत पुरव, विनय राऊत न तरंग पाटील यायीन. मेळाव्यात गायन न भाषणाया स्परदा घेव्या ठरलं. हुरवतीला दुपारश्या एका वेळेत यो मेळावा घेव्या अहं ठरलोवं, पण लोकांसा परतीसाद पाऊन हकाळी १० ते हांशे ५ अही वेळ वाढव्वी लागली. वेळ वाडल्यामुळे, दुपारश्या जेवणा प्रश्न उबा रेलता, पण कट्ट्यार नहलेल्या आपल्या संघाया एका पदाधिकारी समाजबांदवान तो प्रश्न होडवला. याहा श्रेय त्यान न घेता जकल्याना सिसकड़ी ,धान(भात), हुकाबोंबिल बटाटा न वांगी हेगटाया हिन्गायी भाजी अहं वाडवळी जेवण दिलं. संघाहे विश्वस्त श्री दीपक पाटील, श्री हेमंत राऊत, सौ.विमल राऊत, माजी विश्वस्त श्री अनंत राऊत, माजी उपाध्यक्ष श्री रघुनाथ हरी राऊत यायी मेळाव्याला हजेरी लावून कारेक्रमायी सोबा वाडवली. आपल्या समाजाहा अध्यक्षा सौ प्रणिता ठाकुर याना येता आलं नय पण त्यांशी इच्छा

होती का एक वाडवळी मेळावा होवा, तो पार पडला.

मेळाव्या हुरुवातीला ज्यायी सोताह्या कर्तृत्वान वाडवळीया झेंडा अटकेपार रोवला, अह्या सर्वश्री कविवर हेमंत पाटील, श्रीकांत राऊत न विलास राऊत यांसं गुलाबा फुल देऊन कवतीक केलं. त्यानंतर गाण्याही स्परदा जाली, यात घण्या भाहाबयणीयी भाग घेऊन, लग्नाही ,बार्श्याही, पापडाही, हटीयी अही वाडवळी गाणी सादर केली. याहे परीक्षक म्हणून कविवर हेमंत पाटील, सौ सुचिता पाटील, न संघाहे मुख्य चिटणिस किशोर ठाकुर यायी काम पावलं. यानंतर दुपारसं जेवण न विहाम्यानंतर भाषणायी स्परदा जाली. यातव उपस्थित भाहा बयणीन समाजाया सलिरिति ,आमसं बालपण या दिलेल्या विषयावर आपले विसार मांडले. भाषणाहाटी परीक्षक म्हणून बिपिन पाटील, सौ मेघा पाटील न जयकुमार राऊत यायीन काम पावलं. कट्याहे खेड़े हरेश राऊत ,चारुशील पाटील, न प्रवीणा पुरव यायिन कार्यक्रमाहा गाडा मस्त हेपाटला(सूत्रसंसालन केलं).

ज्याईन भाग घेटला त्यांसं कवतिक म्हणून गाण्यात न भाषणात परतेकि पयला, दुहरा, तिहरा न तीन उतेजनार्थ अह्या सहा जणाना बकशीसं दिली. यात गाण्यांमन रूपा विनय राऊत-अल्याळी/बोरिवली, शैला महेश राऊत- नरपड/बोरिवली, अविनाश चिंतामण ठाकूर- पंचाळी यांसा पयला,दुहरा न तिहरा नंबर आला ते दिनेश काशिनाथ राऊत-विरार/नरपड, नव्यता संजय राऊत-विरार/नरपड, चेतना भुपेश ठाकुर- पंचाळी यांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. तहेस भाषणामन विनिता अजय राऊत- पालघर, वर्षा राऊत देशपांडे-चिंचणी/बोरिवली, सुरेंद्र अनंत ठाकुर-पंचाळी/विरार यांसा पयला,दुहरा न तिहरा नंबर आला ते मंगेश सिताराम राऊत-बेटेगाव, संजया जयप्रकाश पाटील-अल्याळी, प्राजक्ता प्रफुल्ल पाटील-नांदगाव/पालघर यांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. श्री.महेश कमळाकर राऊत यांस्यातर्फे भाग घेठलेल्या जकल्यांना पुस्तकं बक्षीस म्हणून वाटली. सबन आपलीस महाणं अहल्यामुळे आबार मानणं बरबर नवतं, तरी ज्यांसं योगदान हाय, त्यांशी आठोन म्हणून तरंग पाटीलजून कारेक्रमा शेवटी सबनाये आबार मानले. वाडवळायीन, वाडवळाहा, वाडवळीहाटी, वाडवळीमन केलेला यो कारेक्रम घणास येशस्वी जाला.

## ❊ विश्वस्त समिती सभा ❊

सोमवार दि १५/०१/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता नवनिर्वाचित विश्वस्त समिती अध्यक्ष श्री. हेमंत नारायण राऊत यांच्या अध्यक्षतेखाली विश्वस्त समितीची सभा डॉ. मधुकर ब राऊत समाजमंदिर, पालघर येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेस एकूण ६ विश्वस्त सदस्य उपस्थित होते. दादर येथे होणाऱ्या ९१ व्या अधिवेशनातील अनुमान व गौरव पुरस्कार देण्यासाठी योग्य व्यक्तींची निवड यावेळी करण्यात आली.

सौजन्य - श्री व सौ. विमल रघुनाथ राऊत-अल्याळी

# क्रीडा समिती अहवाल

सोपाक्षस संघ ट्रस्ट फंड च्या क्रीडा समिती तर्फे २२,२३डिसेंबर रोजी पीडिटीएस, २५ डिसेंबर रोजी विरार येथे क्रिकेट स्पर्धा व २४ रोजी साईग्राम मैदान उमरोळी येथे वैयक्तिक स्पर्धा, कबड्डी ( महिला व पुरुष), व्हॉलीबाल (पुरुष),क्रिकेट (महिला) या स्पर्धा यशस्वीपणे आयोजित करण्यात आल्या. या क्रीडा महोत्सवात निरनिराळ्या प्रकारात जवळजवळ ७०० खेळाडूंनी भाग घेतला. स्पर्धेच्या या ४ दिवसात संघाच्या माननीय अध्यक्षा सौ प्रणिता ठाकूर, विश्वस्त हेमंत राऊत, दीपक पाटील, मंगेश पाटील, राजीव पाटील, विरेंद्र पाटील, अनंत राऊत हे विश्वस्त तसेच पदाधिकारी किशोर ठाकूर, दिलीप पाटील,जयेश राऊत, अभय राऊत,रमाकांत पाटील,अशोक पाटील सह रूपा राऊत, तरंग पाटील, दिनेश पाटील,राजेंद्र पुरव, प्रविणा पुरव, वंदेश पुरव, गिरीश ग. राऊत, मिनेश पाटील, विनय राऊत यांनी स्पर्धा काळात उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. यंदा प्रथमच प्रयोगिक तत्वावर मान. अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली आयपीएल च्या धर्तीवर कबड्डी, व्हॉलीबाल व क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या आणि त्याचे यशस्वी आयोजन क्रीडा समिती तर्फे करण्यात आले. क्रिकेट स्पर्धेतील खेळाडूंना मान. अध्यक्षांतर्फे टि शर्ट भेट देण्यात आले.

क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी क्रीडा समिती अध्यक्ष विशाल पाटील, क्रीडा समिती निमंत्रक दिपेश पाटील, युवा विकास समिती अध्यक्ष उत्पल पाटील यांज बरोबर कपिल पाटील, कांचन राऊत, अस्मिता ठाकूर, हार्दिक सु राऊत, स्नेहल पाटील, पुष्कर पाटील, अदिती पाटील, निमिष राऊत, प्रियांका राऊत, रूपा राऊत, पूर्वा राऊत, यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विशेष सहकार्य केले. वैयक्तिक स्पर्धांचा बक्षिस समारंभ उमरोळी येथे तर सांघिक स्पर्धांचा बक्षिस समारंभ दादर येथील अधिवेशनात करण्यात आला.

स्पर्धेसाठी मैदाने उपलब्ध करून दिल्याबद्दल पीडिटीएस कार्यकारिणी, उमरोळी ग्रामपंचायत, वसई विरार महानगरपालिका यांचे आभार मानण्यात आले.

# नैमत्तिक देणगी

**श्री व सौ कविता किशोर ठाकूर रु. १०००**
**११ मार्च २०१८ रोजी लग्नाला ४० वर्ष पूर्ण झाल्या प्रित्यर्थ.**

**श्री व सौ अस्मिता विनय पाटील रु. ५००**
**कन्या सुयोगी हिस १०/०२/२०१८ रोजी वयाची २० वर्षे पूर्ण झाल्या बद्दल.**

## * हळदी कुंकू समारंभ *

दि. २०/०१/२०१८ रोजी महिला विकास समिति तर्फे मकरसंक्राती निमित्त दुपारी तीन वाजता हळदी कुंकू समारंभ साजरा करण्यात आला. समितीच्या निमंत्रक सौ राखी पाटील ह्यांनी मान्यवरांचे व उपस्थित सर्व महिलांचे स्वागत केले. त्यानी पुढे आपल्या भाषणात सांगितले की हया वर्षी पासून वाण देण्याची पद्धत आपण बंद केली आहे व हा हळदी कुंकू समारंभ सर्व महिलांसाठी आहे. सधवा असो वा विधवा सर्वच महिलांना कुंकू लावण्याचा आधिकार असावा. विधवेला सर्वच धार्मिक विधि, शुभ प्रसंगी सहभागी करून घ्यावे. पती निधनानंतर तिचे कपाळीचे कुंकू पुसणे, मंगलसूत्र काढणे, चुडा फोडणे, तिला भरपूर वेण्या फुलांनी सजवून मग तो सर्व शृंगार सर्वांसमक्ष काढून टाकणे हा प्रकार त्या महीलेस खूप कष्टदायक आहे व तिचे मानसिक खच्चिकरण करणारा आहे. तेव्हा हे प्रकार आपण ह्यापुढे बंद करूया असे आपले मनोगत समितिच्या अध्यक्षा सौ विमल ताई यांनी मांडले. तसेच कार्याध्यक्षा सौ.रूचिता पाटील यांनी १२व्या १३व्या दिवशी भांड्याच्या किंवा इतर स्वरूपात भेट वस्तु देणे बंद करावे असे आपले मत मांडले. समितिच्या माजी अध्यक्षा श्रीमती दामिनीताई यांनी सर्व तरुण युवतींना संघकार्यात सामिल होऊन, पुढाकार घेऊन समाजास पुढे घेऊन जाण्यासाठी आळवाहन केले. सौ यामीनी पाटील यांनी पूर्वी सारखे सुयर, सुतक १० दिवस न पाळता फक्त तीनच दिवस पाळून कुटुंबियांनी सर्व कार्यात सहभागी व्हावे असे आपले विचार मांडले. सौ अदिती पाटील यांनी गरोदर स्त्रियांना गरोदर पणाच्या काळात व बाळंतपणात शासना तर्फे मिळणाऱ्या आर्थिक मदती विषयी उपयुक्त माहिती दिली .उपस्थित सर्व महिलांनी तीळगुळाच्या आस्वादाबरोबरच वेगवेगळी गाणी गाऊन आणि उखाणे, झिम्मा फुगडी यांचा पुरेपूर आनंद लुटला.

हळदीकुंकुवाच्या कार्यक्रमाची सांगता संध्याकाळी ५.३० वाजता करण्यात आली.

## * त्रैमासिक सभा *

सो पा क्ष स संघ ट्रस्ट फंड ची दुसरी त्रैमासिक सभा शनिवार दि १३/०१/२०१८ रोजी डॉ मधुकर ब राऊत समाजमंदिर, पालघट येथे सकाळी १०.०० वाजता संघाच्या अध्यक्षा मान. सौ. प्रणिता पंकज ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. दिवंगताना श्रद्धांजली वाहून झाल्यावर मुख्य चिटणीसानी वाचून सादर केलेले मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. मागील तीन महिन्याचा जमाखर्च खजिनदारांनी वाचून सादर केला. निरनिराळ्या समितीचे अहवाल सादर करण्यात आले. संघकार्याच्या दृष्टीने संघाच्या कार्यक्षेत्रात येणारे निरनिराळे ठराव मंजूर करण्यात आले. नवनिर्वाचित विश्वस्त अध्यक्ष श्री. हेमंत नारायण राऊत यांचा सन्मान करण्यात आला व त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले

# * ९१ वे अधिवेशन *

रविवार दि २८/०१/२०१८ रोजी श्रीमती मंदाकिनी माधव पाटील व श्री माधव रामजी पाटील नगरी सुर्यवंशी क्षत्रिय सभागृह, दादर येथे सो पा क्ष स संघ ट्रस्ट फंड चे ९१ वे वार्षिक अधिवेशन संघाच्या अध्यक्षा मान. सौ प्रणिता पंकज ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहाने आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. श्रीमती निर्मला राव MBBS, MD (सायकाट्रिक) उपस्थित होत्या. विशेष अतिथी म्हणून खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर, माजी महापौर महादेव देवळे, सिने अभिनेते सचित पाटील, नंदकुमार मोघे तसेच संघाचे विश्वस्त, पदाधिकारी व समाज बंधुभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी ९.०० वाजता ध्वजारोहण झाल्यानंतर सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला. सकाळी १०.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. मान. उपाध्यक्षांनी समाजसविता डॉ. मधुकर बळवंत राऊत यांनी शब्दसुमनांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर दादर शाखेतर्फे इशस्तवन व स्वागतगीत सादर करण्यात आले. अधिवेशनाची सुरुवात स्वागताध्यक्ष भरत राऊत यांनी सर्व मान्यवर, समाज बंधुभगिनी यांचे स्वागत करून केली. त्यांनी आपल्या स्वागतीय भाषणात दादर – माहीम शाखेचा जडणघडणीचा इतिहास सांगितला.

विशेष अतिथीनी आपल्या मनोगतात संघ करीत असलेल्या कार्याबद्दल स्तुती करून संघ घडविणाऱ्या कार्यकर्त्यांचे, मान्यवरांचे कौतुक केले. सिने अभिनेते सचित पाटील यांनी आपल्या भाषणात मी आज माझ्या कुटुंबात आल्या सारखे वाटत असून कुटुंबानेच समाजाच्या व्यासपीठावर सन्मान केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रमुख पाहुण्या डॉ. निर्मला राव यांनी युवा पिढीबद्दल विश्लेषण करून आईवडील व मुलांचे कर्तव्य याचे विवेचन केले. डॉ. राव यांचा समुपदेशन व ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या यावर विशेष भर आहे. आजच्या पिढीने व्यसनापासून दूर राहावे असा सल्ला त्यांनी दिला. प्रश्नोत्तराच्या तासात त्यांनी सर्व प्रशनाची समर्पक उत्तरे देऊन सर्वांचे शंका निरसन केले. माननीय अध्यक्षांनी आपल्या मनोगतात सलग दुसऱ्यादा अध्यक्षपद दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली. संघातर्फे करीत असलेल्या उपक्रमात ज्या ज्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले त्यांचे आभार मानून धन्यवाद दिले. संघाच्या निरनिराळ्या निधीमध्ये वाढ करणे व सभासद संख्या वाढविणे ह्यावर त्या लक्ष केंद्रित करणार आहेत.

दुसऱ्या सत्रात खासदार संजय राऊत व त्यांच्या पत्नी यांची निखिला म्हात्रे (TV 9 तर्फे) यांनी मुलाखत घेतली. दादर माहीम शाखेतील ज्येष्ठ व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. समाजात विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या समाज बंधुभगिनीना सन्मान पुरस्कार व गुणवंत पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यानंतर १० वी, १२ वी, उच्चशिक्षित विध्यार्थ्यांचा तसेच संगीत, चित्रकला, निबंध व क्रीडा स्पर्धात यशस्वी झालेल्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. क्रिकेट, व्हॉलीबॉल व कबड्डी विजेत्या व उपविजेत्यांना ही मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देण्यात आल्या. पुढील वर्षाचे ९२ वे अधिवेशन जुहू शाखा आयोजित करणार असे जुहू शाखाध्यक्षा राजश्री मंगेश राऊत यांनी जाहीर केले. दादर–माहीम शाखेतर्फे व संघातर्फे सर्व उपस्थितांचे आभार मानल्यावर ध्वजावतरण करण्यात आले. दादर–माहीम शाखेतील ९१ वे अधिवेशन मोठ्या खेळीमळीच्या वातावरणात संपन्न झाले.

# निधी धोरण निश्चिती समिती

संघाच्या ९० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने सोपविलेल्या जबाबदारीनुसार संघाच्या निधी धोरण समितीने विविध विषयांवर विचारविनिमय केला असुन त्याप्रमाणे सदर समितीने केलेल्या शिफारसींवर व्यवस्थापक मंडळाने विचारविनिमय करुन खालीलप्रमाणे कार्य हाती घेतले आहेत. (संदर्भाकरीता संघाच्या ९० व्या वार्षिक अहवालातील पृष्ठ क्र. दिले आहेत)

१. जमाखर्चातील निधी व अहवालातील विश्वस्तांच्या स्वाधीन केलेले निधी यांतील नोंदीत खालीलप्रमाणे असलेली तफावत दुर करुन तसेच दात्यांचे अपुर्ण तपशील पुर्ण करुन या सर्व नोंदी अद्ययावत करणे.

| अनु. | गुंतवणुकपात्र निधी (पृष्ठ क्र. ३८) | | विश्वस्तांच्या स्वाधीन केलेले निधी (पृष्ठ क्र. ७३ ते १०८) | | तफावत रु. |
|---|---|---|---|---|---|
| | निधीचे नाव | निधी रु. (अ) | निधीचे नाव व (पृष्ठ क्र.) | निधी रु. (ब) | (अ)-(ब) |
| १ | त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी | ४५२४५७ | त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी व वाढ (७३, ७४) | २२२७४० | २२९७१७ |
| २ | क्रिडास्पर्धा निधी | ५२३१०० | क्रिडास्पर्धा निधी (७५, ७६) | ११९१०१ | ४०३९९९ |
| ३ | सभा निधी | ४६९१५ | वार्षिक सभा निधी (७८)<br>त्रैमासिक सभा निधी (७८)<br>एकुण | १६०००<br>+२२०००<br>=३८००० | ८९१५ |
| ४ | सभा संमेलन निधी | ४८९१२५ | वार्षिक अधिवेशन सहाय्य निधी व वाढ (७९) | ३४९१२५ | १४०००० |
| ५ | सन्मान पुरस्कार निधी | ४६२७५० | सन्मान पुरस्कार निधी (८०, ८१) | ४३४७५० | २८००० |
| ६ | गुणवंत गौरव निधी | १०४५०० | गुणवंत गौरव निधी (८१, ८२) | ९८००० | ६५०० |
| ७ | उपनगर वास्तु निधी | २६५२४१ | उपनगर वास्तु निधी (८२)<br>(तफावत कदाचित व्याज मुळ निधीत वर्ग केल्यामुळे) | ८१००० | १८४२४१ |
| ८ | आरोग्य केंद्र निधी | १७९७८१ | आरोग्य केंद्र निधी (८४)<br>(तफावत कदाचित व्याज मुळ निधीत वर्ग केल्यामुळे) | १६९५०० | १०२८१ |
| ९ | वैद्यकीय सहाय्य निधी | १५९९११९ | वैद्यकीय सहाय्य निधी (८५ ते ८९) | १५९९००८ | १११ |
| १० | समाजऋण निधी | १६००० | निराधार सहाय्य निधी (९१) | १४००० | २००० |
| ११ | शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी<br>(चालनाकार अरविंद हरी राऊत सभागृहास वर्ग केलेले रु.६००००/-वजा करुन आलेली रक्कम रु.२०६८९७/-) | ३५२१३० | शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी (९२, ९३) | २०६८९७ | १४५२३३ |
| १२ | स्मरणार्थ शैक्षणिक मदत निधी | ५१००० | स्मरणार्थ शैक्षणिक मदत निधी (९३, ९४) | १५६०० | ३५४०० |
| १३ | शताब्दी शैक्षणिक निधी | ४२१४८२ | शताब्दी शैक्षणिक निधी (९४, ९५) | ३८५००२ | ४१४८० |
| १४ | आवर्ती स्मृती निधी | ७२९६५६ | आवर्ती स्मृती निधी व वाढ (९६ ते १००) | ७२९९०३ | -२४७ |
| १५ | शैक्षणिक पारितोषिक निधी<br>(इ. १२ वी परीक्षा विशेष प्राविण्य पृष्ठ क्र. १०६ छपाई चुकीची दुरुस्ती ५५१५५ चे ५०१५५ व त्यांत ११००१ जमा करुन =६११५६ त्याचप्रमाणे पदवी/उच्चतर परीक्षा प्राविण्य ४५३०१ मधुन ११००१ वजा करुन = ३४३०० | २७९३५८ | शैक्षणिक पारि. निधी शिष्यवृत्ती व वाढ (१०१)<br>शैक्षणिक पारि. निधी शालेय विद्यार्थी (१०१)<br>शैक्ष. पारि. निधी शालांत परीक्षा व वाढ (१०२,१०३)<br>शैक्षणिक पारि. निधी शालांत परीक्षा विषय(१०४)<br>शैक्षणिक पारि. निधी इ. १२ वी (१०५, १०६)<br>शैक्षणिक पारि. निधी पदविका (१०६)<br>शैक्षणिक पारि. निधी पदवी/उच्चतर (१०७, १०८)<br>शैक्षणिक पारि. निधी विशेष परीक्षा (१०८)<br>शैक्षणिक पारि. निधी स्मारक (१०८)<br>शैक्षणिक पारि. निधी शिवणकला (१०८)<br>एकुण | १६३००<br>+३२५००<br>+८३७५०<br>+२६५०१<br>+६११५६<br>+१३०००<br>+३४३००<br>+२००००<br>+७०००<br>+८००<br>=२९५३०७ | -१५९४९ |

सौजन्य - spksstvpatrika@gmail.com

| अनु. | गुंतवणुकपात्र निधी (पृष्ठ क्र. ३८) | | विश्वस्तांच्या स्वाधीन केलेले निधी (पृष्ठ क्र. ७३ ते १०८) | | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| | निधीचे नाव | निधी रु. (अ) | निधीचे नाव व (पृष्ठ क्र.) | निधी रु. (ब) | रु. (अ)-(ब) |
| १६ | स्पर्धा पारितोषिक निधी, छपाई चुकीची दुरुस्ती करुन (पृष्ठ क्र. १०९ निबंध स्पर्धा एकुण रक्कम ६५०० + १००० = ७५००) | २९९०० | स्पर्धा पारितोषिक निधी निबंध स्पर्धा (१०९)<br>स्पर्धा पारितोषिक निधी संगीत स्पर्धा (१०९,११०)<br>स्पर्धा पारितोषिक निधी वक्तृत्व स्पर्धा(११०,१११)<br>एकुण | ७५००<br>+७८००<br>+९५००<br>=२४८०० | ५१०० |

२.संघाच्या जमाखर्चातील साधारण समान उद्देश, विनियोग असलेल्या खालील निधींचे मथळे एकत्र करणे.

| | गुंतवणुकपात्र निधी (पृष्ठ क्र. ३८) | गुंतवणुकपात्र निधीतील प्रस्तावित मथळा | रक्कम रु. | अंतर्भुत निधी (विश्वस्त स्वाधीन निधींमध्ये स्वतंत्रपणे दर्शविणे) | रक्कम रु. | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला विकास निधी | महिला विकास निधी | ६५२७७४<br>+३७००० | महिला विकास निधी<br>महिला वार्षिक अधिवेशन निधी | ६५२७७४<br>३७००० | ७४<br>७४ |
| २ | सभा निधी | सभा व्यवस्थापन निधी | ४६९१५<br>+६५६७५१ | वार्षिक सभा निधी<br>त्रैमासिक सभा निधी<br>सभा व्यवस्थापन निधी | १६०००<br>२२०००<br>६५६७५१ | ७८ |
| ३ | सभा संमेलन निधी | वार्षिक अधिवेशन सहाय्य निधी | ४८९१२५ | वार्षिक अधिवेशन सहाय्य निधी | ४८९१२५ | ७९ |
| ४ | सन्मान पुरस्कार निधी<br>गुणवंत गौरव निधी<br>शाखा गौरव निधी | सन्मान व गौरव पुरस्कार निधी | ४६२७५०<br>+१०४५००<br>+५००० | सन्मान पुरस्कार निधी<br>गुणवंत गौरव निधी<br>शाखा गौरव निधी | ४६२७५०<br>९८०००<br>५००० | ८०<br>८१<br>८२ |
| ५ | आरोग्य केंद्र निधी<br>आरोग्य सेवा निधी<br>वैद्यकिय सहाय्य निधी | वैद्यकिय सहाय्य निधी | १७९७८१<br>+६५०००<br>+१५९९११९ | आरोग्य केंद्र निधी<br>आरोग्य सेवा निधी<br>वैद्यकिय सहाय्य निधी | १७९७८१<br>६५०००<br>१५९९००८ | ८४<br>८५ |
| ६ | समाजऋण निधी | निराधार सहाय्य निधी | १६००० | निराधार सहाय्य निधी | १४००० | ९१ |
| ७ | शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी<br>वैद्यकिय शिष्यवृत्ती निधी | शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी | ३५२१३०<br>+१००००० | शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी<br>वैद्यकिय शिष्यवृत्ती निधी | २०६८९७<br>१००००० | ९२<br>९३ |
| ८ | शिक्षण निधी स्मरणार्थ शैक्षणिक मदत निधी | शिक्षण निधी | ९४७१२५<br>+५१००० | शिक्षण निधी<br>स्मरणार्थ शैक्षणिक मदत निधी | ९४७१२५<br>५१००० | ९३ |
| ९ | स्पर्धा पारितोषिक निधी | स्पर्धा पारितोषिक निधी | २९९००<br>+२०००० (नविन)<br>+१२३३६२ (नवीन) | स्पर्धा पारि. निधी निबंध स्पर्धा<br>स्पर्धा पारि. निधी संगीत स्पर्धा<br>स्पर्धा पारि. निधी वक्तृत्व स्पर्धा<br>स्पर्धा पारि. निधी भास्कर वामन ठाकूर चित्रकला,कथा सादरीकरण स्पर्धा<br>वाडवळ कट्टा बोलीभाषा संवर्धन निधी | ७५००<br>७८००<br>९५००<br>२००००<br>१२३३६२ | १०९<br><br>११०<br>नविन<br>नविन |

३. काही निधींच्या देय व्याजाचा विनियोग सतत होतोच असे नाही. यास्तव ज्या निधींच्या देय व्याजाचा विनियोग झाला नसेल त्यांतील ठराविक निधींचे व्याज मुळ निधीत जमा करणे व इतर निधींच्या देय व्याजासाठी संबंधित उद्दीष्टपुर्ती तरतूद निर्माण करणे. तसेच सर्व निधींच्या देय व्याजाची विनियोगप्रणाली स्पष्ट करणे.

| **गुंतवणुकपात्र निधीचे नाव (पृष्ठ क्र. ३८)** | **निधीची रक्कम** | **देय व्याज वर्ग** | **विनियोग यंत्रणा** | **देय व्याजाचा विनियोग** |
|---|---|---|---|---|
| कायम सभासद निधी | १८२७१०८ | व्यवस्था खर्च तरतूद | पदाधिकारी | व्यवस्था खर्च |
| शताब्दी महोत्सव निधी | ५३१३४३ | व्यवस्था खर्च तरतूद | पदाधिकारी | व्यवस्था खर्च |
| त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी | ४५२४५७ | त्रैमासिक वृत्तपत्रिका तरतुद | त्रैमासिक वृत्तपत्रिका संपादन समिती | त्रैमासिक वृत्तपत्रिका छपाई खर्च |
| शताब्दी शैक्षणिक निधी | ४२१४८२ | शिक्षण कला सांस्कृतिक विकास तरतूद | शिक्षण कला सांस्कृतिक विकास समिती | शिक्षण कला सांस्कृतिक विकास समिती उपक्रम |
| महिला विकास निधी | ६५२७७४ | महिला विकास उपक्रम तरतूद | महिला विकास समिती | महिला विकास समिती उपक्रम |
| (महिला वार्षिक अधिवेशन निधी) | ३७००० | | | |
| युवा विकास निधी | १५३२७५ | युवा विकास उपक्रम तरतूद | युवा विकास समिती | युवा विकास समिती उपक्रम |
| क्रिडास्पर्धा निधी | ५२३१०० | क्रिडास्पर्धा तरतूद | क्रिडास्पर्धा समिती | क्रिडास्पर्धा समिती उपक्रम |
| कृषी विकास निधी | ७१४०४ | कृषी विकास तरतूद | कृषी विकास समिती | कृषी विकास समिती उपक्रम |
| व्यापार उद्योग विकास निधी | १९००० | व्यापार उद्योग विकास तरतूद | व्यापार उद्योग विकास समिती | व्यापार उद्योग विकास समिती उपक्रम |
| सभा व्यवस्थापन निधी (+ सभा निधी) | ६५६७५१ + ४६९१५ | सभा व्यवस्थापन तरतूद | पदाधिकारी | त्रैमासिक आणि वार्षिक सर्वसाधारण सभा व्यवस्था |
| सभा संमेलने निधी / वार्षिक अधिवेशन सहाय्य निधी | ४८९१२५ | वार्षिक अधिवेशन अनुदान तरतुद | पदाधिकारी | वार्षिक अधिवेशन सहाय्य / अनुदान अन्यथा मूळ निधीस |
| सन्मान पुरस्कार निधी | ४६२७५० | सन्मान पुरस्कार तरतूद | पदाधिकारी | सन्मान पुरस्कार |
| गुणवंत गौरव निधी | १०४५०० | गुणवंत गौरव तरतूद | पदाधिकारी | गुणवंत गौरव पुरस्कार |
| शाखा गौरव निधी | ५००० | शाखा गौरव तरतूद | पदाधिकारी | शाखा गौरव पुरस्कार |
| स्पर्धा पारितोषिके निधी | २९९०० | स्पर्धा पारितोषिके तरतूद | निबंध स्पर्धा समिती | कथा सादरीकरण, चित्रकला निबंध स्पर्धा व पारितोषिके |
| | | | संगीत व वक्तृत्व स्पर्धा समिती | वाडवळी बोलीभाषा संवर्धन व संगीत, वक्तृत्व स्पर्धा व पारितोषिके |
| शैक्षणिक पारितोषिके निधी | २७९३५८ | शैक्षणिक पारितोषिके तरतूद | शिक्षण कला सांस्कृतिक विकास समिती | शैक्षणिक पारितोषिके |
| उपनगर वास्तु निधी | २६५२४१ | उपनगर वास्तु संबंधित कामे तरतुद | व्यवस्थापक मंडळ | अन्यथा मुळ निधीस वर्ग |
| नवीन वास्तुनिर्मिती निधी | १७९२१५६ | नवीन वास्तुनिर्मिती तरतूद | व्यवस्थापक मंडळ | नवीन वास्तुनिर्मिती संबंधित कामे |
| सभागृह निधी | २९६८७३ | सभागृह संबंधित कामे तरतूद | व्यवस्थापक मंडळ | अन्यथा मुळ निधीस वर्ग |

वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता घेउन शिक्षणसंस्था निधी हा मथळा जमाखर्चातुन वगळण्यात यावा.

| गुंतवणुकपात्र निधीचे नाव (पृष्ठ क्र. ३८) | निधीची रक्कम | देय व्याज वर्ग | विनियोग यंत्रणा | देय व्याजाचा विनियोग |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| मालमत्ता दुरूस्ती निधी | ९५८००० | मालमत्ता दुरूस्ती व देखभाल तरतूद | व्यवस्थापक मंडळ | मालमत्ता दुरूस्ती व देखभाल |
| घसारा निधी | २७२४८१ | मुळ निधीस वर्ग | व्यवस्थापक मंडळ | घसारा |
| वैद्यकीय सहाय्य निधी<br>आरोग्यसेवा निधी<br>आरोग्यकेंद्र निधी | १५९९११९<br>+ ६५०००<br>+ १७९७८१ | वैद्यकीय सहाय्य तरतूद | आरोग्य सेवा समिती | वैद्यकीय सहाय्य |
| (समाजऋण निधी)<br>निराधार सहाय्य निधी | १६००० | निराधार सहाय्य तरतूद | रमाबाई रघुनाथ पाटील निराधार महिला समाजसेवा समिती | निराधार सहाय्य |
| रमाबाई रघुनाथ पाटील निराधार महिला समाजसेवा निधी | ९००००० | रमाबाई रघुनाथ पाटील निराधार महिला सहाय्य तरतूद | रमाबाई रघुनाथ पाटील निराधार महिला सहाय्य समाजसेवा समिती | निराधार महिला सहाय्य |
| राजाराम रघुनाथ पाटील उच्चशिक्षण शिष्यवृत्ती निधी | १५००००० | राजाराम रघुनाथ पाटील उच्चशिक्षण शिष्यवृत्ती तरतूद | राजाराम रघुनाथ पाटील उच्चशिक्षण शिष्यवृत्ती समिती | आय. ए. एस.,<br>आय. पी. एस. शिष्यवृत्ती अन्यथा परतफेडीच्या अटीवर उच्चशिक्षण मदत |
| शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी | ३५२१३० | शैक्षणिक शिष्यवृत्ती तरतूद | शैक्षणिक मदत समिती | शैक्षणिक शिष्यवृत्ती |
| वैद्यकीय शिष्यवृत्ती निधी | १००००० | वैद्यकीय शिष्यवृत्ती तरतूद | शैक्षणिक मदत समिती | वैद्यकीय शिष्यवृत्ती |
| शिक्षण निधी | ९४७१२५ | शैक्षणिक मदत तरतूद | शैक्षणिक मदत समिती | परतफेडीच्या अटीवर शैक्षणिक मदत |
| स्मरणार्थ शैक्षणिक मदत निधी | ५१००० | शैक्षणिक मदत तरतूद | शैक्षणिक मदत समिती | परतफेडीच्या अटीवर शैक्षणिक मदत |
| आवर्ती स्मृती निधी | ७२९६५६ | अर्धे शिक्षण निधीस | व्यवस्थापक मंडळ | अर्धे शिक्षण निधीस |
| | | अर्धे अहवाल छपाई तरतूदीस | पदाधिकारी | अर्धे अहवाल छपाईस |
| ज. पां. राऊत ग्रंथालय निधी | २५००० | ज. पां. राऊत ग्रंथालय तरतूद | पदाधिकारी | पुस्तके खरेदीस |

| निधीचे नाव | निधीची रक्कम | देय व्याज वर्ग | विनियोग यंत्रणा | देय व्याजाचा विनियोग |
|---|---|---|---|---|
| शाखा निधी (पृष्ठ क्र.३९) | ११९६३२२ | वार्षिक अधिवेशन (संबंधित) शाखा निधी तरतूद अन्यथा संबंधित मुळ निधीत | वार्षिक अधिवेशन शाखा | वार्षिक अधिवेशन आयोजक शाखेच्या शाखा निधीतुन गरजेप्रमाणे रक्कम संबंधित शाखेस<br>अन्यथा संबंधित मुळ निधीत |

| तरतूदीचे नाव | तरतूदीची रक्कम | विनियोग यंत्रणा | तरतूदीचा विनियोग |
|---|---|---|---|
| आकस्मिक तरतूद (पृष्ठ क्र. ३९) | ८६८५६ | विश्वस्त समिती | आकस्मिकपणे उदभवणाऱ्या खर्चासाठी |
| व्यवस्था खर्च तरतूद | नवीन | पदाधिकारी | व्यवस्था खर्चास |
| अहवाल छपाई तरतूद | नवीन | पदाधिकारी | अहवाल छपाईस |
| संघकार्य तरतूद | नवीन | पदाधिकारी | संघकार्य खर्चास |

४. उद्दीष्टापूर्ती तरतूदचे व्याज न वापरल्यास विविध तरतूदीच्या रकमेप्रमाणे संबंधित तरतूदीतच वर्ग करणे

| निधीचे नाव | निधीची रक्कम | देय व्याज वर्ग | देय व्याजाचा विनियोग |
|---|---|---|---|
| उद्दीष्टपूर्ती तरतुद (पृष्ठ क्र. ३९) | १५१८६९१ | उद्दीष्टपुर्ती तरतूदींच्या रक्कमांप्रमाणे संबंधित उद्दीष्टपूर्ती तरतुदीस | संबंधित उद्दीष्टांप्रमाणे |

संस्थेच्या सर्व सभासदांना व देणगीदारांना याव्दारे सुचित करण्यांत येते की, सदर निधींच्या नोंदीसाठी / तपशीलांसाठी, प्रस्तावित नावांसाठी, सुचना अगर माहीती द्यावयाची असल्यांस स्वत:च्या नाव, पत्ता व संपर्क क्रसांकासह संघाच्या मुख्य चिटणिसांकडे दिनांक २३ एप्रिल २०१८ पुर्वी लेखी स्वरुपात द्यावी.

आपली नम्र,
**सौ. प्रणिता पंकज ठाकूर**
संघाध्यक्षा

## वधुवर सूचक मंडळ

इच्छुक मुलामुलींची नावे नोंदविण्यासाठी किंवा माहिती मिळण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या १ ल्या व ३ ऱ्या शुक्रवारी संध्याकाळी ४.०० ते ६.०० च्या दरम्यान डॉ मधुकर बळवंत राऊत सभागृह, पालघर येथे उपस्थित रहावे. अधिक माहिती करिता संपर्क :–

कविता किशोर ठाकूर ९२२४४६३९८२
रंजना दिलीप पाटील ९८६९५४०६१०
मिनल मंगेश पाटील ७३७८३८२५१२
प्रविणा राजेंद्र पुरव ९२२६२०२९२१

विशेष सूचना :– व्यवस्थापक मंडळाच्या दिनांक ०१/०४/२०१८ रोजी झालेल्या सभेत मान. विश्वस्त श्री. राजीव यशवंत पाटील यांनी केलेल्या सूचनेनुसार सभेमध्ये ठरविण्यात आले की यापुढे संघाच्या सर्व सभांची निमंत्रणे व पत्रव्यवहार व्हाट्सॲप किंवा ईमेलद्वारे करण्यात येतील. तरी सर्व सदस्यांनी आपले व्हाट्सॲप नंबर किंवा ईमेल मुख्य चिटणीसांकडे द्यावेत व ही नम्र विनंती.

# सेन्सेक्सचा प्रवास......

जगात सेन्सेक्स १८७५ पासून अस्तित्वात आला आहे.

मुंबई स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध केलेल्या ३० सुस्थापित व आर्थिकदृष्ट्या चांगल्या कंपन्यांची एक फ्री फ्लोट मार्केट–वेटेड शेअर मार्केट इंडेक्स १ जानेवारी १९८६ पासून अस्तित्वात आहे. सदर सेन्सेक्स हा भारतातील देशांतर्गत शेअर बाजाराची नाडी म्हणून ओळखला जातो. १ एप्रिल १९७९ पासून सेन्सेक्सचे मूल्य १०० च्या आधाराने सुरु झाले आहे. खालील तक्ता आपल्याला सेन्सेक्स ची आतापर्यंत झालेली प्रगती दर्शवतो.

तात्पर्य – इक्विटी म्युच्युअल फंडाच्या माध्यमातून संपत्ती निर्माण करण्यासाठी शिस्तबद्ध गुंतवणुक करा व आपले ध्येय साध्य करा. संपत्ती निर्माण करण्यासाठी कोणतीही जादूची छडी किंवा शॉर्टकट उपलब्ध नाही आहे.

**तक्ता**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०० | १ एप्रिल | १९७९ | १२००० | २० एप्रिल | २००६ | २५००० | १६ मे | २०१४ |
| १००० | २५ जुलै | १९९० | १३००० | ३० ऑक्टो | २००६ | २६००० | ७ जुलै | २०१४ |
| २००० | १५ जाने | १९९२ | १४००० | ५ डिसें | २००६ | २७००० | २ सप्टें | २०१४ |
| ३००० | २९ फेब्रु | १९९२ | १५००० | ६ जुलै | २००७ | २८००० | १२ नोव्हें | २०१४ |
| ४००० | ३० मार्च | १९९२ | १६००० | १९ सप्टें | २००७ | २९००० | १५ जाने | २०१५ |
| ५००० | ११ ऑक्टो | १९९९ | १७००० | २६ सप्टें | २००७ | ३०००० | ४ मार्च | २०१५ |
| ६००० | ११ फेब्रु | २००० | १८००० | ९ ऑक्टो | २००७ | ३१००० | २७ मे | २०१७ |
| ७००० | २१ जून | २००५ | १९००० | १५ ऑक्टो | २००७ | ३२००० | १३ जुलै | २०१७ |
| ८००० | ८ सप्टें | २००५ | २०००० | ११ डिसें | २००७ | ३३००० | २५ ऑक्टो | २०१७ |
| ९००० | ५ डिसें | २००५ | २१००० | ५ नोव्हें | २०१० | ३४००० | २६ डिसें | २०१७ |
| १०००० | ७ फेब्रु | २००६ | २२००० | २४ मार्च | २०१४ | ३५००० | १८ जाने | २०१८ |
| ११००० | २७ मार्च | २००६ | २३००० | ९ मे | २०१४ | ३६००० | २३ जाने | २०१८ |
| | | | २४००० | १३ मे | २०१४ | | | |

## आजचा ३२६७५ १० एप्रिल २०१८

**आपल्याला गुंतवणूकीसाठी शुभेच्छा !!!!!**

**अधिक माहिती साठी फोन करा वा प्रत्यक्ष भेटा.**

**विश्वजीत अरुण राऊत**

**म्युच्युअल फंड सल्लागार**

## जीत फायनानशियल सर्विसेस

**२७ वर्षांचा अनुभव**

२,पाम व्हु, तळ मजला, गोखले रोड (उत्तर), शिवसेना भवन समोर,बँक ऑफ महाराष्ट्र च्या बाजूला,शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई –४०००२८.

# श्रद्धांजली

| नाव | | वय | तारीख | गाव |
|---|---|---|---|---|
| ०१) | यशवंत बाबुराव पाटील | ९२ | ०४/११/१७ | नरपड/ दहिसर |
| ०२) | गोविंद देवजी पुरव | ८५ | ०५/११/१७ | मधुकर नगर |
| ०३) | मोरेश्वर नामा राऊत | ८७ | ०६/११/१७ | शिरगाव |
| ०४) | सावित्री जगन्नाथ पाटील | ८० | २५/११/१७ | विरार/ सालवड |
| ०५) | यमुना बाळकृष्ण राऊत | ८३ | ०१/१२/१७ | नांदगाव/केळवे |
| ०६) | श्रीधर बाळा पाटील | ७२ | ०२/१२/१७ | अल्याळी |
| ०७) | स्नेहल सुनिल राऊत | ४२ | ०७/१२/१७ | जुहू |
| ०८) | विजया विरेंद्र राऊत | ६५ | ११/१२/१७ | वरोर/कमारे |
| ०९) | गंगाधर खंडेराव पाटील | ८३ | २३/१२/१७ | बोरिवली/नरपड |
| १०) | बाळकृष्ण विठ्ठल पाटील | ८० | २३/१२/१७ | पार्ले/ म. नगर |
| ११) | रतन सागरनाथ राऊत | ९८ | २८/१२/१७ | दादर |
| १२) | इंदू भालचंद्र राऊत | ९३ | ३१/१२/१७ | सालवड |
| १३) | दिव्येश तुषार पाटील | १५ | ०८/०१/१८ | नांदगाव |
| १४) | सदानंद गोविंद राऊत | ८८ | ०८/०१/१८ | जुहू |
| १५) | विद्याधर लक्ष्मण पाटील | ७८ | १०/०१/१८ | नांदगाव |
| १६) | चिंतामण अनंत ठाकुर | ८३ | १२/०१/१८ | पंचाळी |
| १७) | शालिनी शांताराम पाटील | ८३ | १३/०१/१८ | पंचाळी/माहीम |
| १८) | दिनानाथ भास्कर राऊत | ७५ | १६/०१/१८ | घोलवड/ विरार |
| १९) | तारामती अरुण पाटील | ८७ | २३/०१/१८ | नरपड |
| २०) | शकुंतला रघुनाथ राऊत | ९० | २६/०१/१८ | माहीम |
| २१) | गोपीनाथ अनंत राऊत | ७९ | ३०/०१/१८ | नरपड |
| २२) | शकुंतला गंगाधर पाटील | ८५ | ०९/०२/१८ | नरपड/पोफरण |
| २३) | प्रभावती परशुराम राऊत | ८५ | १३/०२/१८ | नरपड |
| २४) | विनायक गणपत पाटील | ९५ | २०/०२/१८ | केळवे/दादर |
| २५) | हेमलता हरिश्चंद्र राऊत | ८५ | २३/०२/१८ | नरपड |
| २६) | सिताराम लक्ष्मण पुरव | ८८ | २३/०२/१८ | माहिम |
| २७) | विकास सुमंत राऊत | ६५ | ०१/०३/१८ | मधुकरनगर |
| २८) | हरिष विठ्ठल राऊत | ७२ | ०४/०३/१८ | चिंचणी/कळवा |
| २९) | पांडुरंग गणु राऊत | ८३ | ०७/०३/१८ | उमरोळी |
| ३०) | वृषाली विश्वास पाटील | ६७ | ०८/०३/१८ | नांदगाव/ठाणे |
| ३१) | गुलाब जयवंत राऊत | ८१ | २८/०३/१८ | माहिम |

## अभिनंदन

| | | |
|---|---|---|
| सचित पाटील | – | दादर, उत्कृष्ट अभिनेता म्हणून मटा गौरव पुरस्कार |
| विदीता घनश्याम राऊत | – | विरार, ऊमरोळी MBA |
| प्रतिक हेमंत राऊत | – | विरार, माहीम MBA |
| हिमांशू जयप्रकाश राऊत | – | नरपड / दहिसर, बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स) |
| प्रचेता जयप्रकाश राऊत | – | नरपड / दहिसर, बी.एस.सी. (आय.टी.) |
| प्रा. मेघा रोशन पाटील | – | नरपड, 'आदर्श महिला शिक्षक पुरस्कार' मिळाल्याबद्दल. साप्ताहीक जनतेचा वाली व पदवीधर विकास सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा पुरस्कार. |
| कु. अथर्व प्रविण पाटील | – | मधुकरनगर / बोरिवली, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धे (इ. ९ वी) मध्ये महाराष्ट्रामधुन रजत (सिल्व्हर)पदक मिळाल्याबद्दल. |


# त्रैमासिकपत्रिका जाहिरात दर

## वार्षिक(चार अंकासाठी)

पाव पान - १५०० रु. ● अर्धे पान - ३००० रु. ● पूर्ण पान - ५००० रु.

वधु वर जाहिरात (पाव पान) ३०० रुपये ● त्रैमासिक निधी - २०० रु. व पुढे १०० च्या पटीत


**टिप :– शैक्षणिक परतफेड शाखानिहाय यादी प्रत्येक शाखेच्या शाखाध्यक्ष व चिटणीसाकडे देण्यात आली आहे, त्यांना सर्वांनी सहकार्य करावे. डिसेंबर महिन्याच्या आत थकबाकी जमा करावी ही विनंती.**

**बुक - पोस्ट**

प्रति,
श्री. / श्रीमती ____________________

____________________


प्रेषक –
संपादक, ***त्रैमासिक वृत्तपत्रिका सो. पा. क्ष. स. संघ***
डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाज मंदिर, जुना पालघर बोईसर रोड, ता.जि. पालघर–४०१,४०४
दूरध्वनी : ०२२–२८९२९४०७ email - spksstvpatrika@gmail.com
***संपादक व प्रकाशक : श्री. विनय रघुनाथ राऊत***
रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर, भारत सरकार नोंदणी क्रमांक जी १६५/३२२/९९
प्रसिद्धी स्थळ : कर्मवीर ज. पा. राऊत ग्रंथालय, विठ्ठलेश, दामोदर म्हात्रे मार्ग, दहिसर (प.), मुंबई – ६८.
***मुद्रक : ग्राफिक प्रिंटर्स,*** कस्तूरपार्क, शिंपोली, मुंबई – ९२. दूरध्वनी : २८९९९३३०, ९३२२८४०८४६
email : graphic_printers29@rediffmail.com